दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३३३ वा ● बुधवार, ता. १८ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्य बस सफारीचा शुभारंभ


### पक्षीमित्रांची बहुप्रतीक्षित मागणी पूर्णत्वास

**नाशिक । प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात बहुप्रतीक्षित बस सफारी प्रकल्पाचे उद्घाटन विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या हस्ते पार पडले. या उपक्रमामुळे पक्षीप्रेमींना अभयारण्यात विविध पक्ष्यांचे निरीक्षण करण्यासाठी अधिक सोयीस्कर व सुलभ सुविधा उपलब्ध होणार आहेत.




यावेळी वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक पक्षीप्रेमी, आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रकल्पासाठी पक्षीमित्रांनी गेली अनेक वर्षे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून, निसर्गप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी उद्घाटनप्रसंगी सांगितले की, ''निसर्ग व पर्यावरणाच्या संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. ही बस सफारी अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांना पक्ष्यांच्या विविधतेचा अभ्यास करण्याची उत्तम संधी देईल.'' सफारीसाठी विशिष्ट मार्ग आखण्यात आले असून, पर्यटकांना नैसर्गिक जैवविविधतेचा अनुभव सुरक्षितपणे घेता येणार आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. ही बस सफारी नांदूरमध्यमेश्वर अभयारण्यात पर्यावरण पर्यटनाला नवे वळण देणारी ठरणार असून, स्थानिक अर्थकारणालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



**याविषयी अहमदनगर येथील पक्षीमित्र प्राचार्य डॉ.सुधाकर कुऱ्हाडे म्हणाले, नाशिकच्या वन्यजीव विभागामार्फत नांदूर मधमेश्वर पक्षी अभयारण्यासाठी स्पेशल बसची व्यवस्था करण्यात आली, ही निसर्ग आणि पक्षी अभ्यासकांच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे. तथापि ही बस सकाळी सात वाजता नाशिकहून निघून परत दुपारी बारा वाजता नाशिकला येणार असल्याचे कळते, म्हणजेच नांदूर मधमेश्वर या रामसर स्थळी पक्षी निरीक्षणासाठी फक्त दोनच तासांचा अवधी मिळेल. खरंतर नांदूर मधमेश्वर पक्षी अभयारण्य हे तुकड्या तुकड्यांमध्ये विभागलेले आहे. तेथील निरीक्षण मनोरे ही बंधाऱ्यापासून दूर असल्याने दोन तासांचा अवधी हा अतिशय कमी वाटतो. सुरुवात आहे आणि निसर्ग पर्यटकांचा कसा प्रतिसाद मिळतो यासाठी एखाद्या वेळेस हे वेळेचे गणित असावे, परंतु जर निसर्ग पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळाला तर सकाळी सातला निघालेली बस सायंकाळी सात वाजता पुन्हा नाशिकला आल्यास पर्यटकांना भरपूर वेळ (किमान आठ नऊ तास) तेथे घालवता येईल आणि तेथील जैवविविधतेचा चांगल्या पद्धतीने अभ्यास, निरीक्षणही करता येईल. पर्यटकांच्या या सात आठ तासांच्या वास्तव्यामुळे तेथील स्थानिकांना देखील चहा, कॉफी, नाश्ता आणि जेवण या मार्फत रोजगारही मिळू शकतो. हा वन्यजीव विभागाचा उपक्रम स्तुत्य असला तरी या उपक्रमाला किती प्रतिसाद मिळतो यावरच याची यशस्विता अवलंबून राहील.**

## राज्याच्या कृषी विकासासाठी तयार करा नवा लोगो आणि घोषवाक्य

### आपल्या प्रतिसादाची अपेक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी विभागाच्या दृश्य माध्यमांमधील सशक्त ओळख निर्माण करण्यासाठी एक अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. विभागाने नवीन बोधचिन्ह (Logo) व घोषवाक्य (Tagline) तयार करण्यासाठी राज्यभरातील सर्व नागरिकांसाठी स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा सर्वसामान्य जनतेसाठी खुली असून, सृजनशील आणि प्रेरणादायी संकल्पना विभागाकडे सादर करून सहभागी होण्याची ही एक अनोखी संधी आहे. शेतकरी कल्याण, शाश्वत शेती, कृषी संशोधन यांचा समावेश असलेले बोधचिन्ह आणि विभागाच्या कार्याशी सुसंगत घोषवाक्य अपेक्षित आहे. घोषवाक्य केवळ मराठी भाषेत असावे व त्याबाबत १०० शब्दांतील स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. स्पर्धेतील पारितोषिके पुढीलप्रमाणे

Logo विभाग: प्रथम पारितोषिक ₹१,००,००० २ उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ₹१०,०००

Tagline विभाग: प्रथम पारितोषिक ₹५०,०००, २ उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ₹५,०००

संपूर्ण कलाकृती JPEG/PNG तसेच AI/SVG/PDF या स्वरूपात krushipublicity@gmail.com या ईमेलवर २५ जून २०२५ पर्यंत पाठवाव्यात. अधिक माहितीसाठी ०२०-२५५३७८६५ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. ''तुमच्या कल्पनाशक्तीला द्या एक नवी दिशा राज्याच्या कृषी विकासात घ्या सर्जनशील सहभाग!'' या घोषणेने कृषी विभागाने सर्जनशील व्यक्तींना एक नवा मंच उपलब्ध करून दिला आहे.

# कृषि, उद्योग, सामाजिक न्याय आणि शिक्षणक्षेत्राला बळ

## राज्य मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे निर्णय

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत आज विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून त्यामध्ये कृषि, सामाजिक न्याय, आदिवासी उद्योग, शिक्षण आणि पायाभूत सुविधा यांचा समावेश आहे. या निर्णयांमुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे. ''महाॲग्री-एआय'' धोरणास मंजुरी : राज्यातील कृषि क्षेत्राला डिजिटल युगाशी सुसंगत बनवण्यासाठी ''महाराष्ट्र कृषि-कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय (MahaAgri-AI) धोरण २०२५-२९'' ला मंत्रिमंडळाची मंजुरी देण्यात आली. या धोरणामुळे ॲग्रीस्टॅक, महा-ॲग्रीस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारख्या डिजिटल प्रकल्पांना चालना मिळेल. हवामान माहिती अधिक अचूक होणार : WINDS (Weather Information Network Data System) अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे (AWS) उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भात ''महावेध'' प्रकल्पास पुढील पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. आणीबाणी काळातील लढवय्यांना सन्मान : १९७५-७७ या आणीबाणीच्या काळात लोकशाहीसाठी लढा देणाऱ्यांना आता वाढीव मानधन मिळणार आहे. यासोबतच हयात जोडीदारालाही मानधन देण्याचा आणि काही अटी शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आदिवासी उद्योजकांसाठी उद्योगसंधी : नाशिक जिल्ह्यातील जांबुटके (ता. दिंडोरी) येथे २९ हेक्टर ५२ आर जमीन ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरित करण्यात येणार आहे. यामुळे आदिवासी समाजातील नवउद्योजकांना उद्योग स्थापन करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध होणार आहे. उद्योगविकासासाठी मुद्रांक शुल्कात सवलत : एमएमआरडीए व रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी जमिनीशी संबंधित करारावर लागणाऱ्या मुद्रांक शुल्कात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. विधी शिक्षणाला चालना : महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठास मुंबईतील गोरेगाव येथील मौजे पहाडी भागातील जमीन देण्यात आली आहे. या जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयांमुळे राज्यातील शेतकरी, उद्योजक, समाजसेवक, आणि विद्यार्थ्यांना नव्या संधी मिळणार असून शासनाच्या 'विकासाच्या वाटचालीत सर्वांचा सहभाग' या धोरणाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन



## मुख्यमंत्री फडणवीस यांना आषाढी एकादशी महापूजेचे निमंत्रण

**मुंबई । प्रतिनिधी**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे औपचारिक निमंत्रण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री निवास वर्षा येथे सदिच्छा भेट घेऊन हे निमंत्रण सुपूर्त केले. या वेळी मुख्यमंत्र्यांचा विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, चिपळ्या, उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. पारंपरिक भक्तिभाव आणि वारकरी संस्कृतीचा सुगंध दरवळणाऱ्या या भेटीने श्रद्धेचे वातावरण निर्माण झाले होते. शिष्टमंडळात मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, सदस्य संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आदींचा समावेश होता. दरवर्षी लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने पार पडणारी आषाढी एकादशीची शासकीय महापूजा ही एक महत्त्वाची परंपरा असून, यामार्फत राज्याच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक एकतेचे दर्शन घडते. यंदा देखील मुख्यमंत्री स्वतः उपस्थित राहून श्री विठ्ठलाचे पूजन करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## इंडिगोचे विमान झेपावताच काही काळ हेलकावे



**पणजी । प्रतिनिधी**

अहमदाबाद येथील एअर इंडिया विमानाच्या झालेल्या अपघाताच्या घटनेतून देश सावरत असतानाच गोव्यातून काळजाचा ठोका चुकवणारी घटना समोर आली. मोपा विमानतळावरून उड्डाण घेताच इंडिगोच्या विमानाचा तोल जाऊन, विमान खाली येऊ लागले, पायलटने प्रसंगावधान दाखवत विमान नियंत्रित केले. पण, लखनऊपर्यंत १७२ प्रवाशांनी जीव मुठीत घेऊन प्रवास केला. गोव्यातून इंडिगो कंपनीचे ६ई ६८११ विमानाने सोमवारी ता.१६ रोजी दुपारी लखनऊसाठी उड्डाण घेतले. उड्डाण घेतल्यानंतर विमानाचा तोल जाऊन विमान जमिनीच्या दिशेने येऊ लागले. विमान कोसळणार की काय या भीतीने विमानातील प्रवाशांनी जीवाच्या आकांताने आक्रोश केला. दरम्यान, वैमानिकाने प्रसंगावधान दाखवत विमान नियंत्रित करत सुरक्षितपणे लखनऊच्या अमौसी विमानतळावर सुरक्षितपणे उतरवले, असा थरारक अनुभव या विमानातून प्रवास करणाऱ्या प्रवासी जॉली खान यांनी समाजमाध्यमावरून सांगितला आहे.

# रस्त्यावरच्या अरेरावीचा डॉ. राजेंद्र धामणे यांना आलेला अस्वस्थ करणारा अनुभव

## पोलिस प्रमुख सोमनाथ घार्गे पोलिसदलाची प्रतिमा खराब करणारांवर वचक ठेवणार का?

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सामान्य माणूस आपले आयुष्य शांतपणे, कुणालाही न दुखावता जगत असतो. पण काही सरकारी कर्मचारी, विशेषतः पोलीस खात्यातील काही व्यक्ती, आपल्या पदाचा गैरवापर करत सामान्य माणसांवर दडपशाही करून आपली 'मुर्दुमकी' दाखवत असतात. असाच एक अनुभव मनगाव प्रकल्पाचे प्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजेंद्र धामणे यांना नुकताच आला आणि तो त्यांच्या शब्दांत अस्वस्थ करणारा ठरला. डॉ. धामणे हे मनगावहून अहिल्यानगरकडे जात असताना सावेडी नाक्याजवळ त्यांच्या दुचाकीला एका काळ्या काचा असलेल्या काळ्या क्रेटा कारने धडक दिली. ही घटना घडल्यावर त्या कारमधून एक अडदंड व्यक्ती आणि



त्याचा सहकारी उतरले आणि अत्यंत उद्धटपणे वागू लागले. शिवीगाळ करत रस्त्यातच धमकावत ते डॉ. धामणे यांना खाली उतरवू लागले. डॉ. धामणे यांनी परिस्थिती समजून न घेता आक्रमक होत असलेल्या त्या व्यक्तीच्या वागणुकीवर शंका घेतली. काही वेळाने तो स्वतःला पोलीस असल्याचे सांगू लागला. पुढे चौकशीत समजले की, हा व्यक्ती म्हणजे पो. कॉ. शरद (भाई) अहिरे, श्रीरामपूर पोलीस स्टेशनच्या गुन्हे शाखेतील कर्मचारी आहे. ही व्यक्ती पोलीस असल्याचा वापर करून जबरदस्तीने नुकसान भरपाईची मागणी करत होती. शिवाय 'तुझ्यावर गुन्हा दाखल करतो' अशी धमकीही दिली गेली. डॉ. धामणे यांनी त्यांची बहीण वरिष्ठ पोलीस निरीक्षक असल्याचा उल्लेख केल्यावरच काहीशी नरमाई दाखवली गेली. महत्त्वाचे प्रश्न उपस्थित : या घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होतात: सरकारी पोलीस कर्मचारी रस्त्यावर सामान्य नागरिकांशी अशा अरेरावीने का वागतात? साध्या (गुन्हे शाखा) पोलिसाकडे काळी काच असलेली महागडी गाडी, आयफोन १६ प्रो, रेबन गॉगल यासारख्या वस्तू कुठून येतात? अशा कर्मचाऱ्यांवर संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी का दुर्लक्ष करतात? सामान्य माणसाने अशा प्रसंगी संरक्षणासाठी कुणाकडे धाव घ्यायची? डॉ. धामणे यांच्यासारख्या सामाजिक कार्यकर्त्यांना जर असा त्रास सहन करावा लागत असेल, तर सामान्य नागरिकांचे काय? पोलिसांवरील विश्वास डळमळीत डॉ. धामणे हे गेली अनेक वर्षे रस्त्यावरच्या महिलांसाठी, बेवारस मातांसाठी काम करत आहेत. त्यांच्याच प्रयत्नातून सध्या ४७७ माता-भगिनी व ४२ मुले मनगावी सुरक्षित राहतात. पण पोलिसांकडून असा अनुभव आल्यावर, समाजातील अशा सेवाभावी कार्यकर्त्यांचीही झोप उडते, ही बाब प्रशासनासाठी धोक्याची घंटा आहे. सरकार व पोलीस प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी अपेक्षा आहे.

# २०२४ भाजपा जिंकली कशी?

## पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात राजकीय वैचारिक महाभारत

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीनंतर राजकीय चर्चांचा केंद्रबिंदू ठरलेलं २०२४ भाजपा जिंकली! कशी? हे ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भोईटे लिखित पुस्तक, एका थरारक आणि विचारप्रधान कार्यक्रमात प्रकाशित करण्यात आलं. ग्रंथाली प्रकाशनाच्या वतीने आयोजित या प्रकाशन आणि मुक्तपीठ सन्मान सोहळ्याने सत्ताधारी आणि विरोधकांना एकाच मंचावर आणत राजकीय जुगलबंदीचे दृश्य उभे केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते एबीपी माझा आणि एबीपी न्यूजचे मुख्य संपादक राजीव खांडेकर. त्यांनी म्हटले, जे राजकारणात क्वचितच घडतं, ते या पुस्तकामुळे घडलं. विविध पक्षांचे दिग्गज एकत्र आले, आणि हेच या पुस्तकाच्या सत्यतेचं लक्षण आहे. विरोधकांचा रोखठोक सवाल, सत्ताधाऱ्यांचे मुद्देसूद प्रत्युत्तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि शिवसेनेचे नेते भास्कर जाधव यांनी पुस्तकाच्या शीर्षकावरून भाजपावर हल्लाबोल केला. ''भाजपा जिंकलीच कशी?'' हा प्रश्न लोकांच्या मनात आहे आणि भोईटे यांनी आकडेवारीसह त्या प्रश्नाला भिडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तर भाजपाचे मुंबई अध्यक्ष आणि कॅबिनेट मंत्री आशिष शेलार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, पुस्तकाचे शीर्षक म्हणजे भाजपाविरोधातील टीका नव्हे, तर एका सखोल विश्लेषणाची सुरुवात आहे. ''तथ्यांवर आधारित विश्लेषण न समजता राजकीय टीका करणे योग्य नाही,'' असे ते म्हणाले. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रेम शुक्ल यांनी पुस्तकाचे इंग्रजी आणि हिंदी भाषांतर करण्याची गरज व्यक्त केली. ''हे पुस्तक राहुल गांधींनाही वाचायला द्यावं,'' असं मिश्कील भाष्यही त्यांनी केले. भोईटेंचे सडेतोड भाष्य लेखक तुळशीदास भोईटे यांनी सांगितले की, २३ नोव्हेंबर २०२४ रोजी निकाल लागले तेव्हाच त्यांच्या मनात ''भाजपा जिंकली! कशी?'' हा प्रश्न उमटला. त्यांनी आवाहन केले की, पुस्तकातील प्रत्येक प्रकरण समजून वाचावे आणि नंतरच त्यावर भाष्य करावे. ''चुका असतील तर पुढील आवृत्तीत सुधारण्याची तयारी आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. अभ्यासू विश्लेषण आणि लोकशाहीचं आरसपानी दर्शन राजीव खांडेकर यांनी पुस्तकाचे कौतुक करताना वर्तमान पत्रकारितेतील एकांगी प्रवृत्तीवरही प्रहार केला. ''भोईटेंनी ही हिंमत दाखवली, हे कौतुकास्पद आहे. अशा पत्रकारितेला साथ मिळाली पाहिजे,'' असं त्यांनी नमूद केले. मुंबई विद्यापीठाचे प्रा. डॉ. दीपक पवार यांनी या पुस्तकातील आर्थिक शक्तीच्या राजकारणावर भाष्य करत, सत्तेच्या सोयीसाठी बसलेले भविष्यात धोका पत्करत आहेत, असा सूचक इशारा दिला. एकात्म विचारांचे मंच आणि पत्रकारितेचा गौरव पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने पत्रकार संघटनेच्या वतीने बीड, रत्नागिरीतील निर्भीड पत्रकारांचाही मुक्तपीठ सन्मान करण्यात आला. अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी भोईटे यांच्या अभ्यासपूर्ण विश्लेषणाला निवडणूक अभ्यासासाठी ''संदर्भग्रंथ'' म्हणत त्यांचं विशेष अभिनंदन केलं. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध अँकर भूषण करंदीकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरुण जोशी, धनश्री धारप, डॉ. विजय कदम, डॉ. राजेश सर्वज्ञ, ॲड. जयेश वाणी यांचे विशेष योगदान लाभले. '२०२४ भाजपा जिंकली! कशी?' हे पुस्तक केवळ निवडणूक निकालाचे विश्लेषण नाही, तर भारतीय लोकशाहीच्या ढाच्यावर केलेले एक नितांत प्रामाणिक भाष्य आहे. यामध्ये पक्षभेद विसरून वैचारिक मतभिन्नतेचे सुसंस्कृत प्रदर्शन झाले, हेच या कार्यक्रमाचे यश ठरावे लागेल.

# बालभवन स्वयंसेविकांना रेनकोटसह पावसाळी किट

## मराठी पत्रकार परिषदेचा सामाजिक उपक्रम



**अहमदनगर । प्रतिनिधी**

बालविवाहमुक्त जिल्हा करण्यासाठी कार्यरत असलेल्या स्नेहालय संचलित 'उडान प्रकल्प' आणि शहरातील झोपडपट्टी भागात शिक्षणातून पुनर्वसन करणाऱ्या 'बालभवन'मध्ये कार्यरत महिला स्वयंसेविकांना पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने रेनकोटसह पावसाळी किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून तोफखाना पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण, पत्रकारांच्या नाशिक विभागीय अधिस्वीकृती समितीचे सदस्य विजयसिंह होलम, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, 'उडान'चे व्यवस्थापक प्रवीण कदम, बालकल्याण समिती सदस्य ॲड. अनुराधा येवले, बालभवन प्रकल्पाच्या व्यवस्थापिका उषा खोलम, मुक्ती वाहिनीचे समन्वयक शाहीद शेख व नवेद शेख आदींसह स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सहा. पो.नि. कल्पना चव्हाण यांनी सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकांसाठी झटणाऱ्या हाताला बळ देण्याचे कार्य मराठी पत्रकार परिषद सातत्याने करत असून, पत्रकारांनी सामाजिक संवेदना जागवत मदतीचा हात पुढे करण्याचे कार्य केल्याने ते अत्यंत कौतुकास्पद आहे. प्रश्न मांडून थांबण्याऐवजी तो तडीस नेण्याचे कार्य परिषद करत असल्याचे त्या म्हणाल्या. विजयसिंह होलम यांनी सांगितले की, सर्व प्रश्न केवळ शासकीय यंत्रणेद्वारे सुटत नाहीत, तर समाजात उतरून लढा द्यावा लागतो. स्नेहालय संचलित उडान व बालभवन हे शेवटच्या घटकांसाठी झटत असून, त्या संघर्षाला हातभार लावण्याचे कार्य पत्रकार परिषद करत आहे. दिंडीतील वारकऱ्यांपासून बालदिन उपक्रमांपर्यंत अनेक सामाजिक उपक्रम परिषद राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. ॲड. अनुराधा येवले यांनी परिषद राबवत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. पावसाळ्यातही बालविवाह प्रतिबंधासाठी मोटारसायकलवरून विविध ठिकाणी काम करणाऱ्या 'उडान'च्या स्वयंसेविका तसेच झोपडपट्टीतील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या 'बालभवन'च्या महिला कार्यकर्त्यांसाठी रेनकोट व किट्स उपलब्ध करून देण्यात आल्याचे मन्सूर शेख यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण कदम यांनी तर आभार उषा खोलम यांनी मानले.



# अंधश्रद्धा सोडा, विज्ञानवादी बना - सीमाताई बोके

## हुंडा देणार नाही, घेणार नाही सामाजिक शपथेसह महिला सशक्तीकरणाचा निर्धार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या जिजाऊ ब्रिगेडच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त पश्चिम महाराष्ट्राची बैठक १५ जून रोजी अहिल्यानगर शहरातील हॉटेल रोज गोल्ड येथे पार पडली. या बैठकीत जिजाऊ ब्रिगेडचे कार्य, त्याचा प्रभाव, आणि भविष्यातील दिशा यावर सखोल चर्चा झाली. यावेळी प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके यांनी अध्यक्षीय भाषणात जिजाऊ ब्रिगेडच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा गौरव करत हे वर्ष अहिल्यानगरीसाठी अभिमानास्पद असल्याचे नमूद केले. सीमाताईंनी सांगितले की, जिजाऊ ब्रिगेड ही एक वैचारिक चळवळ आहे. महिलांनी अंधश्रद्धा, रूढी, परंपरांपासून बाहेर येत विज्ञानवादी दृष्टिकोन अंगीकारावा व महापुरुषांचे विचार आत्मसात करून सक्षम व्हावे, ही काळाची गरज आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके होत्या. यावेळी मंचावर मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय मार्गदर्शक इंजी. विजयकुमार ठुबे, आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष इंजी. सुजाता ठुबे, प्रदेश कार्याध्यक्ष राजश्री शितोळे, जिल्हाध्यक्षा ॲड. स्वाती जाधव, शहराध्यक्ष सुरेखा कडूस, तसेच विभागीय व प्रदेशस्तरीय पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविकात राजश्री शितोळे यांनी जिजाऊ ब्रिगेडच्या २५ वर्षांच्या कार्याचा आढावा घेत "ही संस्था संस्थापक शोभा जाधव व अलका शितोळे यांच्या प्रयत्नातून आज वटवृक्ष बनली आहे," असे सांगितले. त्यांनी सर्व माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना श्रेय दिले. यावेळी इंजी. सुजाता व विजयकुमार ठुबे दांपत्याचा विशेष सत्कार मानपत्र देऊन करण्यात आला. इंजी. सुजाता ठुबे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, "महिलांनी संघटित होऊन नव्या पिढीपर्यंत जिजाऊ ब्रिगेडचा विचार पोहोचवावा." रेश्मा आठरे म्हणाल्या, "जिजाऊ ब्रिगेड महिलांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत प्रभावी कार्य करते," तर संध्याताई मेढे यांनी "जिजाऊ ब्रिगेड ही काळाची गरज आहे. महिलांनी अन्यायाविरोधात आवाज उठवावा," असे स्पष्ट केले. पत्रकार मीरा शिंदे यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, "प्रत्येक महिलेत जिजाऊंची ऊर्जा आहे, ती ओळखून जागृत करा. रडणाऱ्या नव्हे तर लढणाऱ्या महिला घडवा." इंजी. विजयकुमार ठुबे यांनी आपल्या भाषणात पत्नी सुजाता ठुबे यांचा गौरव करत सांगितले की, "तिने स्वतःच्या करिअरचा त्याग करून कुटुंब व संघटनेच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावली." या बैठकीत पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी हुंडा देणार नाही, घेणार नाही या सामाजिक शपथेसह महिला सशक्तीकरणाचा निर्धार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन सुरेखा कडूस यांनी केले. कार्यक्रमात प्रसिद्ध हॉर्स रायडर भारती शेवते यांनी "शिवगर्जना" सादर करून वातावरण उत्साही केले, तर डॉ. कल्पना ठुबे यांनी "जिजाऊ वंदना" सादर केली. जय जाधव यांनी कार्यक्रमाच्या डॉक्युमेंट्रीसाठी विशेष सहकार्य केले.

# मोबाईलपासून अलिप्त राहून वाचनसंस्कार वाढवावेत- बाळासाहेब देशमुख

## आनंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप



**अहमदनगर । प्रतिनिधी**

गुलमोहर रोडवरील आनंद माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमात कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या शारदा पोखरकर होत्या. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात प्राचार्या शारदा पोखरकर यांनी शाळेत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. नवीन शैक्षणिक वर्षातील नियोजित उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तावाढीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे त्यांनी विशेषत्वाने उल्लेख केले. प्रमुख पाहुणे बाळासाहेब देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना "आई-वडिलांचे संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पुस्तक वाचन यांची त्रिसूत्री अंगीकारावी. यामुळे आयुष्य उज्ज्वल होण्यास मदत होते. मोबाईलपासून अलिप्त राहून वाचनसंस्कार वाढवावेत," असे मार्गदर्शन केले. 'लेखक आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. यावेळी 'मानवतेचा धर्म' ही कथा सादर करताना ग्रामीण भागातील महिलांचा समाजोपयोगी सहभाग त्यांनी कथाकथनाच्या माध्यमातून प्रभावीपणे उलगडला. गरीब विद्यार्थ्यांना ताक-दही वाटणे, बदलून आलेल्या शिक्षकांना विनामूल्य निवास देणे, आणि गरजू मुलींना पौष्टिक आहार देणे यांसारखी माणुसकीची उदाहरणे त्यांनी अत्यंत समर्पकपणे मांडली. त्यांचे कथाकथन सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करणारे ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल बोडखे यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर बाळकृष्ण हजारे, देवका लबडे, पुंजाराम पवार, अनिता कोरडे, अपर्णा क्षीरसागर, सीमा सोले व विठ्ठल म्हस्के हे मान्यवर उपस्थित होते. आभार प्रदर्शन देवका लबडे यांनी केले.



# ऑक्झिलियम कॉन्व्हेंट शाळेच्या नवीन मुख्याध्यापिका सिस्टर मारिया यांचा सत्कार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सावेडी येथील ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलमध्ये नुकत्याच पदभार स्वीकारलेल्या नवीन मुख्याध्यापिका सिस्टर मारिया यांचा औपचारिक सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जाणिव फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रदीप वाखुरे यांनी त्यांना शुभेच्छा देत सदिच्छा भेट म्हणून रोपटे प्रदान केले. कार्यक्रमात शाळेच्या व्यवस्थापिका सिस्टर रिटा लोबो, मोहटा देवस्थान विश्वस्त ॲड. तथा नोटरी पब्लिक विक्रम वाडेकर, प्रतिथयश छायाचित्रकार राहुल जोशी, ॲड. तथा इंजिनीअर कैलाश दिघे, संजय माने आणि विकास गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. सत्कारप्रसंगी सिस्टर मारिया यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. उपस्थित मान्यवरांनी त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम एक सकारात्मक सामाजिक एकोप्याचे प्रतीक ठरला असून, शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्याचा आदर्श नमुना प्रस्तुत केला.



# विधी परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा वृक्षारोपण करत सन्मान

**अहमदनगर । आबीद खान**

अलीकडेच पार पडलेल्या विधी विभागाच्या परीक्षेत प्रथम श्रेणीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा कर्मयोगी प्रतिष्ठानच्या वतीने गौरव करण्यात आला. या विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी हजरत मिरावली पहाड येथे प्रतिष्ठानचे अध्यक्ष शफी जहागिरदार यांच्या पुढाकाराने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी या हेतूने विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.


सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांमध्ये खालील विध्यार्थ्यांचा समावेश होता : ॲड. सानिया नफिस चुडीवाला (एल.एल.बी.), ॲड. अरीबा फारुक शेख (एल. एल.बी.), ॲड. नोमान अझीम जहागिरदार (एल. एल.बी.) तसेच अहमदनगर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात १२ वीत विशेष प्राविण्यासह प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या निदा इकबाल चुडीवाला हिचाही विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना झाडांची भेट देण्यात आली. कार्यक्रमास शरद पवार होमिओपॅथिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रिजवान अहमद, मिनर्व्हा इन्फ्राचे इंजिनिअर अनिस शेख, नगरसेवक असिफ सुलतान, ज्येष्ठ विधीज्ञ फारुक बिलाल, समाजसेवक नफिस चुडीवाला, जी. ए. एजन्सीचे अझीम जहागिरदार, डॉ. रेश्मा रिजवान, ॲड. साजिया सय्यद, तसेच जोधपूर येथून आलेले हैदर अली उपस्थित होते. कर्मयोगी प्रतिष्ठानचे मार्गदर्शन सदस्य आणि ज्येष्ठ त्वचारोगतज्ज्ञ डॉ. एम. के. शेख यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देत त्यांचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे नातेवाईकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रतिष्ठानचे माजी जिल्हा समाजकल्याण अधिकारी रफिक मुन्शी, पत्रकार मोहसीन बारुदवाले, डॉ. इमरान शेख, समिर खान यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# वैष्णवी कॉलनी जलमय; निचऱ्याच्या प्रश्नावर उपाययोजना करण्याची मागणी

## नैसर्गिक ओढे-नाले बुजविल्याने निर्माण झाले प्रश्न

**अहमदनगर । प्रतिनिधी**

पाईपलाईन रोडवरील श्रीकृष्ण नगर परिसरातील वैष्णवी कॉलनीत पावसाचे साचलेले गाळयुक्त व मैलामिश्रित पाणी घरात शिरत असून परिसर जलमय झाला आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, निचऱ्याच्या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. या वेळी माजी नगरसेवक निखील वारे, विजयकुमार कुलकर्णी, प्रकाश कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, विशाल साबळे, श्रीमती भंडळकर, दत्तात्रय कुलकर्णी, जीवन क्षीरसागर, कौशल्या लोखंडे आदी नागरिक उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी कॉलनीलगत वाहणारा नैसर्गिक ओढा अतिक्रमणामुळे बुजवण्यात आला असून त्याऐवजी लहान पाईपमधून पाण्याचा निचरा केला जातो. मात्र मुसळधार पावसात या पाईपांची क्षमता अपुरी पडत असल्याने साचलेले पाणी थेट घरात शिरते. त्यामुळे लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचे आरोग्य धोक्यात येत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा मनपा प्रशासनाकडे तक्रारी केल्या असूनही आजपर्यंत ठोस कार्यवाही झालेली नाही. अखेर थेट आयुक्तांकडे निवेदन सादर करण्यात आले. आयुक्त यशवंत डांगे यांनी याची गंभीर दखल घेत वैष्णवी कॉलनीची पाहणी करून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.




रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा



हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

रयत समाचार





# महावितरण अधिकाऱ्यांना ओगलेंनी खडसावले

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

प्रत्येक अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे अन्यथा या पुढील काळात कोणाचीही गय केली जाणार नसल्याचे आमदार हेमंत ओगले यांनी स्पष्ट केले. मतदारसंघात सर्वात जास्त प्रश्न हे महावितरणचे असून जे प्रश्न वरिष्ठ कार्यालयाशी निगडित आहे ते सोडवण्यासाठी प्रयत्नशील आसल्याचे आमदार ओगले म्हणाले.

श्रीरामपूर- राहुरी विधानसभा मतदारसंघातील विजेच्या प्रश्नसंदर्भात आ. हेमंत ओगले यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजी सभापती बाबासाहेब दिघे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, माजी उपनगराध्यक्ष अंजुम शेख, मुजफ्फर शेख, राजेंद्र सोनवणे, दिलीप नागरे, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, सुरेश निमसे, गोरखनाना पवार, लकी सेठी, विलास दाभाडे, रितेश रोटे, कलीम कुरेशी, भरत कुंकूलोळ उपस्थित होते. गेल्या काही दिवसांपासून श्रीरामपूर शहर व ग्रामीण परिसरात मोठ्या प्रमाणात विजेचा लपंडाव चालू असून त्यासंदर्भात आमदार हेमंत ओगले यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते सदर बैठकीला सर्व तालुक्यातून मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनीच विजेच्या प्रश्न संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले. थोडा तरी पाऊस पडला तरी चोवीस- चोवीस तास विजेचा पुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

यावेळी माजी उपनगराध्यक्ष करण ससाने म्हणाले की, गेल्या काही महिन्यांपासून वीज पुरवठा मोठ्या प्रमाणावर खंडित होत आहे त्याचा परिणाम हा दैनंदिन पाणीपुरवठ्यावर होताना दिसून येत असून नागरिकांसह, शेतकरी, व्यापारी हे सर्वच विजेच्या प्रश्नामुळे त्रस्त आहे. आमच्या संयमाचा अंत पाहू नका अन्यथा या पुढील काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा करण ससाणे यांनी दिला. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नसंदर्भात महावितरणचे कार्यकारी अभियंता अजय भंगाळे यांनी खुलासा केला. या पुढील काळात महावितरणचे सर्वच अधिकारी कर्मचारी ग्राहकांच्या सेवेत राहतील असे आश्वासित केले.

यावेळी असिफ दारूवाला, रियाज पठाण, संजय गोसावी, निलेश नागले, प्रताप कवडे, दिपक वमने, संतोष परदेशी, अतुल खरात, सुनील साबळे, लखन सानप, अमोल नाईक, रितेश चव्हाणके, सतीश पाटणी, गणेश गायधने, सरबजीतसिंग चुग, बाबा वायदंडे, गणेश काते, रितेश गिरमे, झियान पठाण, वैभव कुरहे, कुणाल पाटील, परेश गाडेकर, सनी मंडलिक, राजेश जोंधळे, सागर दुपाटी यांच्यासह सर्व तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.



# संभाजी ब्रिगेडसह मराठा सेवा संघाची आढावा बैठक संपन्न

## आगामी निवडणुकांसाठी रणनिती ठरली

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड यांची श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक शनिवार,ता. १४ जून रोजी संपन्न झाली. बैठकीस इंजी. सुरेश इथापे, इंजी. बी. के. महाडिक, राजेश परकाळे, राजश्री शिंदे, राजेंद्र राऊत, दिलीप वाळुंज, दत्ता भोसले, सुनील (पिंटू) पवार, उज्वला शेळके, प्रतिमा पवार, विशाल मांडगे आदी उपस्थित होते. राजेश परकाळे यांनी, गाव पातळीवर शाखा सुरू करून कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला. जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजनही लवकरच होणार असून, त्यात तालुकास्तरावरील विविध समस्यांवर चर्चा होणार आहे. नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पदाधिकारी निवड करण्यात आली श्रीगोंदा तालुका: तालुका कार्याध्यक्ष सौरभ शितोळे, तालुका संघटक कृष्णा जगताप, उपाध्यक्ष बापू जगताप, अल्पसंख्यांक आघाडी तालुकाध्यक्ष सद्दाम शेख, उद्योजक आघाडी तालुकाध्यक्ष राजेंद्र गव्हाणे, शेतकरी आघाडी उपाध्यक्ष नवनाथ कंद, कार्याध्यक्ष पांडुरंग खोरे कर्जत तालुका:तालुका सचिव अमोल आरडे, शेतकरी आघाडी तालुकाध्यक्ष अनिकेत शिंदे, युवक तालुकाध्यक्ष नितीन शेलार, शहराध्यक्ष सज्जन पोकळे, अल्पसंख्यांक आघाडी तालुकाध्यक्ष रमजान शेख, कामगार आघाडी तालुकाध्यक्ष सुशेन कदम, तालुका उपाध्यक्ष वैभव काळदाते, व्यापारी तालुकाध्यक्ष नागेश खेडकर, ऋषिकेश गांगर्डे यांचा विशेष सहभाग बैठकीचे आयोजन श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजी. शाम जरे, दिलीप लबडे, व कर्जत तालुकाध्यक्ष वैभव लाळगे यांनी केले. बैठकीस कालिदास शिंदे, रामदासजी काळदाते, रावसाहेब धांडे, सुयोग धस, रवींद्र महांडूळे, संदिप जगताप, संतोष आरडे मेजर, घनशाम काळे, उत्तम मामा घोगरे, बापुराव शिंदे, राहुल शेठ नवले, उज्ज्वला शेळके, रोहन गांगर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.



# जवाहर विद्यालयात रंगला नवागतांचा स्वागत सोहळा

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चांदा येथे नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य डॉ. दीपक शिंदे होते. कार्यक्रमाला संस्था कार्यकारिणी सदस्य नानासाहेब अंबाडे, नेवासा पंचायत समितीचे माजी सभापती कारभारी जावळे, सरपंच रावसाहेब कान्हु दहातोंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बाबासाहेब जावळे, शालेय समिती सदस्य प्रा. अशोक चौधरी, माजी पर्यवेक्षक एन. टी. शिंदे, पोलीस पाटील कैलास अभिनव, शहाजी धुमाळ, बंडू दहातोंडे, अशोक कुंडलिक चौधरी, संजय दहातोंडे, दिपक जावळे, विजय रक्ताटे, पत्रकार देविदास चौरे, तसेच प्राचार्य डॉ. शिवाजी सावंत, उपप्राचार्य रघुनाथ भोजने, पर्यवेक्षक राजेश शेंडगे, समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे, प्रसिद्धीप्रमुख प्रा. रावसाहेब राशिनकर व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी आयोजित या स्वागत समारंभात इयत्ता पाचवीत नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे फुलांचे हार, बिस्किट पाकिटे व मोफत पाठ्यपुस्तके देऊन मान्यवरांच्या हस्ते औपचारिक स्वागत करण्यात आले.

यावेळी शाळेच्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. प्रा. अशोक चौधरी यांच्या पुढाकाराने शाळा परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी रुख्मिणी सोनवणे, कला शिक्षक स्वप्निल मालवंडे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक संजय ढेरे यांनी केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाच्या स्वाती दळवी व प्रा. भाऊसाहेब तांबे यांनी तर आभार प्रदर्शन संदीप शेंडगे यांनी केले.

# राजमाता विद्यालयात विद्यार्थिनींचे उत्साहात स्वागत

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

शहरातील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर, फ ुलांची उधळण, हातात नवीन पाठ्यपुस्तके, नवाकोरा पेन आणि तोंडात जिलेबीचा गोड घास घेत नवागत विद्यार्थिनींनी शैक्षणिक वाटचालीला पहिलं पाऊल टाकलं. सोमवार, ता. १६ जून २०२५ रोजी विद्यालयाचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा झाला. नवागत विद्यार्थिनींचं स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात आलं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या नवनियुक्त मुख्याध्यापिका वर्षा भोईटे होत्या. त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व



ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर कु. प्राजक्ता कोथिंबीरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य कुंडलिक दरेकर, उपनगराध्यक्षा ज्योती खेडकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा ज्योती वायभासे, मनीषा कोथिंबीरे, महादजी शिंदे विद्यालयाचे दिलीप भुजबळ, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष पीटर रणशिंग, शकील शेख, बापूराव औटी, अशोक गदादे, पांडुरंग जगदाळे, निवृत्ती खेतमाळीस, विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका नीलिमा कातोरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी एस.एस.सी. परीक्षेत उज्ज्वल यश मिळवणाऱ्या विद्यार्थिनींचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे यांनी केले, सूत्रसंचालन सारिका दिवटे यांनी केले, तर गुरुकुलप्रमुख किरण शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानत विद्यालयासाठी आर्थिक मदतीचे आवाहन केले. कार्यक्रमाचे समारोप वृक्षारोपणाने करण्यात आले.

# डॉ.अश्विनी नेतने-खंदारे यांना पीएचडी



**नेवासा । विजय खंडागळे**

अश्विनी सुभाष नेतने (खंदारे) यांना प्राणिशास्त्र (Zoology) विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी Studies on Helminth Parasites from Fresh Water Catfishes from Ahmednagar District या विषयावर आपला संशोधन प्रबंध पूर्ण केला असून, हा प्रबंध मौलाना आझाद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील मार्गदर्शक प्रा. डॉ. जे. डी. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आला. त्यांचे हे संशोधन अहमदनगर जिल्ह्यातील गोड्या पाण्यातील कॅटफिश मास्यांवरील हेल्मिंथ परोपजीवींच्या अभ्यासावर आधारित असून, हे कार्य मत्स्य व्यवसायिकांसाठी तसेच मत्स्य संशोधनात कार्यरत असणाऱ्या अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरणारे आहे. डॉ. अश्विनी नेतने (खंदारे) यांनी स्कोपस, यूजीसी केअर लिस्ट व फिशरी सायन्स रिसर्च जर्नल्समध्ये एकूण ९ संशोधन निबंध प्रकाशित केले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

डॉ. अश्विनी नेतने (खंदारे) या मुळा एज्युकेशन सोसायटीच्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा येथील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रवींद्र खंदारे यांच्या सुविद्या पत्नी आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य डॉ. मझहर फारुकी, डॉ. विजयकुमार काटेपागा, डॉ. ज्ञानेश्वर देशमुख, डॉ. नेतनकर, डॉ. सुरेश काळे, डॉ. बी. एन. सोनवणे, डॉ. एम. जी. वर्पे, डॉ. सय्यद कादरी, डॉ. तरन्नुम आदींनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# नवजीवन व कमिन्सकडून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे धडे

## विद्यार्थ्यांना वृक्षभेट देऊन स्वागत

**नगरतालुका । भगवान राऊत**


येथील नवजीवन प्रतिष्ठान समन्वयीत व कमिन्स इंडिया फाउंडेशन अर्थसहाय्यित मॉडेल व्हिलेज ससेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागतोत्सवानिमित्त वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन, सेंद्रिय शेतीचे आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्व याबद्दल माहिती देण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके, गणवेश व बुट भेट देऊन त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. नवजीवन प्रतिष्ठानचे उदय पवार, नगर तालुक्यातील ससेवाडी चे सरपंच चांगदेव ससे, मुख्याध्यापिका मंजुषा माने, जिल्हा रेशीम विकास अधिकारी संदीप आगवणे, कृषी मित्र धोंडीभाऊ जरे, पर्यावरण प्रेमी नवजीवनचे अमित गायकवाड, दिपक बत्तिशे, विजय दळवी, तुकाराम मगर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी पर्यावरण प्रेमी अमित गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना पृथ्वीची उत्पत्ती, वातावरणात होणारे बदल, सजीव सृष्टीची निर्मिती, मानवाची उत्क्रांती, बुद्धीचा विकास, शेतीचा शोध, औद्योगीकरण, यंत्राचा शोध, मानवाच्या सुखी जीवनाच्या हव्यासापोटी होणारा निसर्ग आणि पर्यावरणाचा ऱ्हास, वृक्षतोड, वातावरणातील असमतोल, झाडांचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांना मनोरंजनातून प्रबोधन केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पृथ्वीवर सध्या ते ३३ टक्के झाडे असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र पृथ्वीवर फक्त २ टक्के झाडांचे अस्तित्व शिल्लक आहे. झाडांचे प्रमाण पृथ्वीवरून कमी झाल्यामुळे पावसाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. प्रचंड वृक्षतोड होत असल्यामुळे आपण निसर्गापासून दूर जात आहोत. त्यामुळे अनेक अडचणींना आपल्याला सामोरे जावे लागते. या संकटातून बाहेर पडण्यासाठी वृक्षारोपण, त्यांचे जतन, संवर्धन करणे गरजेचे आहे. त्यासाठी नवजीवन प्रतिष्ठान व कमिन्स इंडिया फाउंडेशनने पुढाकार घेऊन वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाची चळवळ हाती घेतली आहे असे ते म्हणाले. नवजीवन प्रतिष्ठानने नगर तालुक्यातील ससेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी किचन



शेडची उभारणी, स्वच्छतागृहाची उभारणी, पिण्याच्या पाण्याची सोय, परसबागेची निर्मिती, खेळासाठी मैदानाची निर्मिती तसेच शाळा खोल्यांची दुरुस्ती व देखभाल असे काम केले आहे. त्याचा शाळेला मोठा फायदा होत आहे असे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संजय ससे यांनी यावेळी सांगितले. सचिन पेंडभाजे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापिका मंजुषा माने यांनी आभार मानले. यावेळी शाळेचे शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली.



भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# प्रभुणे यांचे कार्य समाजाला दिशादर्शक - डॉ. विद्यासागर

## अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कलारंजन प्रतिष्ठान आणि सोहम् ग्रंथालयाच्या वतीने सन्मान

**पिंपरी । प्रतिनिधी**

सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत मोलाचे कार्य करणारे कर्मतपस्वी गिरीश प्रभुणे हे समाजाला दिशादर्शक ठरले आहेत, असे गौरवोद्गार रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी काढले.


संत तुकारामनगर येथील सोहम् सार्वजनिक ग्रंथालयात सोमवार, १६ जून रोजी झालेल्या विशेष सत्कार समारंभात ते बोलत होते. पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कलारंजन प्रतिष्ठान आणि सोहम् ग्रंथालयाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र ग्रंथालयाचे माजी उपसंचालक बाबुराव हंद्राळे होते. यावेळी भटक्या-विमुक्त चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते महादेव गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश यादवाडकर, प्रा. माधव राजगुरू, प्रा. बाळकृष्ण माडगूळकर, सोहम ग्रंथालयाचे अध्यक्ष जगन्नाथ नेरकर, आणि कलारंजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. विद्यासागर यांनी प्रभुणे यांच्या कार्याची प्रशंसा करताना सांगितले की, ''केंद्र सरकार कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम राबवण्याच्या तयारीत आहे, पण प्रभुणे यांनी भटक्या-विमुक्त समाजाच्या पारंपरिक कौशल्यांना आधार देत समरसता गुरुकुलमच्या माध्यमातून हे कार्य आधीच प्रत्यक्षात आणले आहे. ही त्यांची दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकीचे उदाहरण आहे.'' कार्यक्रमात सोहम ग्रंथालयाच्या अभ्यासिकेतून अभ्यास करून दहावी, बारावी आणि परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी परीक्षेत यश मिळवलेल्या राधिका पिसे हिने मनोगत व्यक्त करताना, ''माझ्या यशामध्ये सोहम ग्रंथालयाचा मोलाचा वाटा आहे,'' असे नमूद केले. सत्काराला उत्तर देताना प्रभुणे म्हणाले, ''भटक्या-विमुक्त समाजाकडे असलेल्या ज्ञानाची समृद्धी चमत्कारासारखी आहे. त्यांच्या सान्निध्यातूनच मी खूप काही शिकलो.'' त्यांनी सोहम ग्रंथालयाचे कौतुक करताना, ''हे ग्रंथालय पिंपरी-चिंचवडच नव्हे, तर पुणे जिल्ह्याचे आदर्श ठरले आहे,'' असे गौरवोद्गार काढले.

दीपप्रज्वलन आणि सरस्वतीपूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्रीकांत चौगुले यांनी प्रास्ताविक करताना, ''गिरीश प्रभुणे यांच्या कार्याला अभिवादन करण्याची सुसंधी मिळाल्याचा आम्हाला अभिमान आहे,'' असे सांगितले. अध्यक्ष जगन्नाथ नेरकर यांनी ग्रंथालयाच्या यशस्वी वाटचालीविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन प्रदीप गांधलीकर यांनी केले तर आभार नितीन जाधव यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.



# नाटेगाव सरपंचपदी गणेश मोरे बिनविरोध

## ग्रामविकासाच्या दिशेने आदर्श कारभार करण्याचा निर्धार

**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव तालुक्यातील नाटेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कोल्हे गटाचे गणेश आप्पासाहेब मोरे यांची बिनविरोध निवड झाली असून, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. या निवडीनंतर त्यांचे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, तसेच सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे यांनी विशेष अभिनंदन केले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मच्छिंद्र पोकळे यांनी काम पाहिले. गणेश मोरे यांच्या नावाची अधिकृत सुचना जयवंत बाबासाहेब मोरे यांनी केली होती. निवडीनंतर नवनिर्वाचित सरपंच गणेश मोरे यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना गणेश मोरे म्हणाले, ''गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली जनविकासाच्या योजना प्रभावीपणे राबवून ग्रामपंचायतचा कारभार आदर्श करण्याचा प्रयत्न केला जाईल.'' यावेळी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक त्र्यंबकराव सरोदे, बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम, डी. पी. मोरे, डॉ. गोरक्षनाथ मोरे, राजेंद्र मोरे, नारायण मोरे, दगू मोरे, शरद मोरे, जयराम मोरे, ताराचंद मोरे, दत्तात्रय मोरे, गोरख मोरे यांच्यासह ग्रामपंचायतीचे सदस्य, विविध संस्था, कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामसेवक सिद्धार्थ काळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत उपस्थितांचे आभार मानले.

# सिंगल युज प्लास्टिकला रामराम!

## हरियाली संस्थेचे विशेष जनजागृती अभियान



**अहमदनगर । प्रतिनिधी**

सिंगल युज प्लास्टिकमुळे वाढणारे पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी सुरेश खामकर यांची हरियाली संस्था पुढाकार घेऊन एक विशेष जनजागृती मोहीम राबवत आहे. या उपक्रमाअंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिकेतील घनकचरा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्या मोफत वाटण्यात आल्या. ही उपक्रमात्मक बैठक उपायुक्त संतोष टेंगळे यांच्या उपस्थितीत पार पडली. या वेळी घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे यांच्यासह इतर कर्मचारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ''सिंगल युज प्लास्टिकला नकार'' हा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून शहरभर पोहोचवण्यात येत आहे. माझी वसुंधरा अभियान, स्वच्छ भारत मिशन, आणि प्लास्टिक प्रतिबंध मोहिमेच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम एक सकारात्मक पाऊल ठरत आहे. पर्यावरण रक्षणासाठी जनजागृती ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांमध्ये सिंगल युज प्लास्टिकविरोधात जागरूकता वाढेल, असा विश्वास हरियाली संस्थेने व्यक्त केला आहे.



# अनुसूचित जाती-जमाती व अल्पसंख्याक वस्त्यांचे विभाजन करून प्रभागरचनेत फेरफार करण्याचे डावपेच

**नांदेड । प्रतिनिधी**

राज्यात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना गती मिळालेली असताना, नांदेड-वाघाळा महापालिकेच्या प्रभाग रचनेवर राजकीय हस्तक्षेपाचे सावट पुन्हा गडद होत असल्याची तीव्र भावना व्यक्त करण्यात येत आहे. २०१७ मधील चार सदस्यीय प्रभाग रचनेप्रमाणेच नव्या निवडणुकाही पार पाडाव्यात, अशी जोरदार मागणी करत एक निवेदन महापालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आले.

या निवेदनात सुसंगत समाजघटक व वस्तींच्या एकात्मतेला सुरुंग लावणाऱ्या राजकीय डावपेचांविरोधात संतप्त भूमिका घेण्यात आली आहे. राजकीय फायद्यासाठी समाजघटकांचे कृत्रिम विभाजन? शहरातील काही राजकीय नेत्यांकडून, विशेषतः एका माजी सेक्युलर नेत्याने भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर, अनुसूचित जाती-जमाती व अल्पसंख्याक वस्त्यांचे कृत्रिम विभाजन करून प्रभागरचनेत फेरफार करण्याचे डावपेच सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे दलित, आदिवासी व अल्पसंख्याक समाजाच्या राजकीय प्रतिनिधीत्वावर गदा येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ''जर प्रभाग रचनेत राज्य शासनाच्या निकषांना बगल देऊन राजकीय दबावाखाली फेरफार केला, आणि एससी, एसटी व अल्पसंख्याक वस्तींची तोडफोड झाली, तर उद्रेक अनिवार्य आहे. त्याला प्रशासनच जबाबदार असेल,'' असा स्पष्ट इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

शहरात पाच खासदार व दहाहून अधिक आमदारांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोपही करण्यात आला. यामुळे प्रभाग रचना पारदर्शक व न्याय्य न केल्यास सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, असेही निवेदनकर्त्यांनी म्हटले आहे. निवेदनावर अहमद (प्रदेश उपाध्यक्ष), शिवा नरंगले (जिल्हाध्यक्ष), श्याम कांबळे (जिल्हा महासचिव), विठ्ठल गायकवाड (महानगराध्यक्ष), ॲड. शेख बिलाल (कायदेशीर सल्लागार), अमृत नरंगलकर (शहर महासचिव), कैलास वाघमारे (प्रदेश प्रवक्ता), सम्यक विद्यार्थी आघाडी, एस. एम. भंडारे, गौतम डुमने व अन्य पदाधिकारी आदी मान्यवरांच्या सह्या आहेत.

# राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासी विकासाला तडे खर्च आणि तरतुदींमध्ये मोठी तफावत

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

महाराष्ट्र सरकारच्या २०२४२५ च्या अर्थसंकल्पात आदिवासी घटकासाठी करण्यात आलेल्या तरतुदी आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये मोठी तफावत असल्याचा निष्कर्ष एका अभ्यासपूर्ण अहवालातून समोर आला आहे. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या आदिवासी विकास केंद्रातर्फे हा अभ्यास अहवाल प्रसिद्ध करण्यात आला असून, त्याचे प्रकाशन ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या हस्ते झाले. आरोग्य विभागासाठी ₹२५,०१५ कोटींची तरतूद असूनही प्रत्यक्ष खर्च ₹२०,०५० कोटीच झाला आहे. शिक्षण विभागासाठी ₹८९,७०५ कोटी मंजूर असून त्यापैकी सुमारे ₹८३,३०० कोटी खर्च झाले. प्राथमिक आरोग्य केंद्र, पोषण आहार योजना, मातामृत्यू प्रतिबंध, तसेच आश्रमशाळा आणि छात्रावास योजनांसाठीचा निधी रखडलेला असल्याचे नमूद करण्यात आले. वनहक्क अभ्यासक प्रा. गीतांजय साहू यांच्या मते, ''तात्पुरती जमीन मिळूनही उपजीविका योजनांची अंमलबजावणी होत नाही.'' प्रा. रवी गावित यांनी सांगितले की, ''आदिवासी योजनांपैकी निम्म्याहून अधिक निधी वापरला जात नाही.'' डॉ. वैशाली पाटील यांनी शेतकरी आदिवासी महिलांच्या योजनांतील भेदभावावर बोट ठेवले.विठ्ठल लाड यांनी शहरी आदिवासींना योजनांचा फायदा न मिळाल्याची खंत व्यक्त करताना गौण वनोत्पादनासाठी बाजारपेठ धोरणाची गरज अधोरेखित केली.




## अभ्यास अहवालात गंभीर निरीक्षणे

सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा शिंदे यांनी ''फक्त नाव बदलून 'ट्रायबल सब-कॉम्पोननंट' करून उपयोग नाही,'' असे स्पष्टपणे नमूद केले आणि स्वतंत्र ऑडिट, जिल्हास्तरीय अहवाल व स्थानिक प्रतिनिधित्व बंधनकारक करण्याची मागणी केली. आदिवासी योजनांसाठी स्वतंत्र श्वेतपत्रिका जाहीर करणे. लोकनियंत्रण वाढवणे. ग्रामसभा आणि स्थानिक स्वराज संस्थांना निर्णायक अधिकार देणे. विभागीय समन्वय बळकट करणे. कार्यक्रमाचा समारोप करताना दत्ता बाळसाराफ म्हणाले, ''हा अहवाल केवळ आकडेवारी नव्हे, तर धोरणात्मक दिशा दाखवणारा दस्तऐवज आहे. आता राज्य शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत.'' या अभ्यास अहवालातून राज्य सरकारच्या आदिवासी विकासासाठी असलेल्या आर्थिक नियोजनात असलेल्या उणिवा स्पष्टपणे समोर येतात. योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी निश्चित करून प्रत्यक्ष परिणाम सुनिश्चित करण्याची गरज मान्यवरांनी अधोरेखित केली.